PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

कृपया प्रसिद्धीकरिता

## १४ व्या पार्ले महोत्सवात पहिल्याच दोन दिवसात १०००० स्पर्धकांचा उस्फूर्त प्रतिसाद

## गोपीनीथ मुंडे, विनोद तावडे, पुनम महाजन

## अशोक कुमार, उत्तरा केळकर, सुमित राघवन अशा मान्यवरांचा सहभाग

मुंबई दि २३: १४ व्या पार्ले महोत्सवाचे शानदार उद्घाटन २१ डिसेंबर रोजी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते झाले असुन पहिल्या दोन दिवसात १० स्पर्धांमधून सुमारे १० हजार स्पर्धक सहभागी झाले होते. गायन ५० मीटर धावणे, गोळा फेक, सायकलिंग , मॅरेथॉन, अशा वैयक्तिक तर क्रिकेट, बॉक्स क्रिकेट, वॉलीबॉल, कबड्डी अशा सांघिक स्पर्धांना उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेषतः भारतरत्न सचिन तेंडुलकर गौरांगण असे नाव दिलेल्या दुभाषी मैदान क्रिडापट्टु तसेच स्पर्धा पाहण्यास आलेल्या क्रिडारसिकांनी भरुन गेले होते. हजारोंच्या संख्येने आलेल्या क्रिडापट्टुंसह उठुन दिसत होते ते विशेषतः५० मीटर शर्यतीत भाग घेतलेली ५ वर्षांची प्राची देसाई व अवघ्या ४ वर्षांची देविका पारकर व ५ किमी शर्यतीत धावलेल्या ६८ वर्षीय प्रमिला व ६२ वर्षिय दक्षा कनाविया, नेत्रहिन असुनही १० किमी धावणारे अमरजीत सिंग चावला, पी चंद्रा, व नीशा खरे, गीत गीयन स्पर्धेत भाग घेणाऱ्या ५ वर्षीय आस्था हळदणकर व ८० वर्षीय मधुकर पाठारे तसेच ५० मिटर धावणे व गोळाफेकमध्ये भाग घेणारे दिशा कर्णबधीर शाळेतील विशेष मुलींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आत्तापर्यंत विविध स्पर्धामध्ये पुणे, नाशिक औरंगाबाद, जळगाव तसेच कलकत्यातूनही स्पर्धक सहभागी झाली आहेत.

हॉकीचे जादुगार म्हणुन जगविख्यात मेजर ध्यानचंद यांनाही भारतरत्न प्रदान करण्यात यावे अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे लोकसभेतील उपनेते श्री.गोपीनाथ मुंडे यांनी केली आहे. सचिन तेंडुलकर यांना भारतरत्न मिळाल्यामुळे क्रिडापट्टुंना सर्वोच्च मान मिळाला आहेच पण अजुनही मेजर ध्यानचंद यांचे नाव भारतरत्न पुरस्कारापासुन वंचित राहिले आहे, असे ही ते म्हणाले. पार्ले महोत्सव म्हणजे देशाच्या अर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची शान आहे असे कौतुकोद्गार विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी काढले.पार्ले महोत्सव हा मुंबईचा ब्रॅण्ड झाला असुन, मुंबईतील प्रत्येक क्रिडांगणातून क्रिडापट्टु येथे आल्याचे दिसते आहे, असे भाजपा राष्ट्रीय सचिव पुनम महाजन म्हणाल्या.

स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धक मेहनत घेत असतो व आपली किती तयारी झाली आहे हे त्यास कळते, मिळालेले यश किंवा अपयश विसरून पुन्हा मेहनत सुरू केली तरच एक उत्तम कलावंत निर्माण होईल, असे प्रतिपादन सुप्रसिध्द गायिका उत्तरा केळकर यांनी साठ्ये महाविद्यालयामधील उभारलेल्या स्वर्गीय विनय आपटे नगर सुरू असलेल्या गायन स्पर्धेच्या प्रसंगी काढले. सारेगमप- युध्द ताऱ्यांचेमध्ये स्पर्धक म्हणुन उतरलो तेव्हा मला खुप काही शिकता आले व त्यामुळे अशा स्पर्धांचे महत्त्व तेव्हा मला जाणवले.पार्ले महोत्सवातील सर्व स्पर्धकांनी स्पर्धेच्या निमित्ताने केलेली तयारी कायम उपयुक्त ठरेल असे सुप्रसिध्द अभिनेते सुमित राघवन म्हणाले. तर मेजर ध्यानचंद यांनी आम्हाला केवळ हॉकीच नव्हे तर देशासाठी खेळण्यास शिकवले असे त्यांचे सुपुत्र व भारतीय संघाचे माजी कर्णधार अशोककुमार यांनी सांगितले. आपल्या कारकिर्दीत आतंरराष्ट्रीय स्पर्धेत ४०० तर एकूण १००० गोलकरणारे तसेच ज्यांनी देशास ऑलिंपिकमध्ये तीन सुवर्णपदक मिळवून देणारे हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांना भारतरत्न प्रदान करण्यात यावा या मागणीचा पुर्नउच्चारही त्यांनी केला.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.